महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

मुख्य संपादक : रवींद्र घोडविंदे

Rs.2/-

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

रविवार ❖ २५ मे २०२५ ❖वर्ष ६ ❖अंक ३२६ ❖ पाने - ४

RNI NO : MAHMAR/2016/72091 Postal Reg. No. THC/256/2022-2024

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पत्रकार हवे आहेत

दैंनिक ठाणे जीवनदीप वार्ता करिता खालील ठिकाणी पत्रकार नियुक्त करणे आहे. इच्छुकांनी संपर्क करावा

• मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर • बोईसर • वसई • विरार • भाईंदर • पनवेल • वाडा • बदलापूर • शहापूर • आसनगाव • भिवंडी • कसारा • कर्जत • सरळगाव • म्हसा • धसई • अंबरनाथ • विठ्ठलवाडी • उल्हासनगर • टिटवाळा • शहाड • कोनगाव • आंबिवली • दिवा • कळवा

दैनिक 'ठाणे जीवनदीप वार्ता'
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.)
संपर्क क्रमांक : ९६१९९१८८५५८/९०८२६ ६४७८१
E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com

# विकासाला गती व रोजगार निर्मिती हेच ध्येय ! – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

नवी दिल्ली : नुकतीच नीती आयोगाची महत्त्वाची बैठक पार पडली, या बैठकीमध्ये भाषण करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यात सध्या सुरू असलेल्या विविध योजनांबाबत आणि भविष्यात राबवण्यात येणाऱ्या योजनांसंदर्भात माहिती दिली.





फडणवीस यांच्या भाषणातील ठळक मुद्दे

भारतीय सैन्य दल आणि भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांचे 'ऑपरेशन सिंदूर' बद्दल हृदयपूर्वक आभार आणि अभिनंदन. मोदीजींच्या दहशतवादाविरोधात झिरो टॉलरन्सचा संकल्प यातून अधोरेखित होतो.

राष्ट्रीय धोरणानुसार, महाराष्ट्र सरकार सुद्धा महाराष्ट्र 2047 असे व्हीजन तीन टप्प्यात तयार करीत आहे. 100 दिवसांच्या सुशासन, नागरिक केंद्रीत उपाययोजना आणि उत्तरदायित्व अशा सूत्रावर एक कार्यक्रम आमच्या सरकारने हाती घेतला. यात विविध विभागांनी 700 हून अधिक उद्दिष्ट साध्य केले.

आता दीडशे दिवसांचा कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे. यात 2047 साठी दीर्घकालीन, महाराष्ट्र आपला अमृत महोत्सव साजरा करेल, त्या कालावधीचे म्हणजे 2035 साठी आणि प्रतिवर्षाच्या उद्दिष्टांसह 2029 साठीचे अल्पकालिक 5 वर्षांचे असे व्हीजन तयार करण्यात येत आहे.

विद्यमान अर्थव्यवस्था 2030 पर्यंत 1 ट्रिलियन डॉलर्स आणि 2047 पर्यंत 5 ट्रिलियन डॉलर्सची करणे, हा आमचा मुख्य उद्देश आहे. नवीन उद्योग धोरणाचा उद्देश जीडीपीत उत्पादन क्षेत्राचे योगदान 20 टक्क्यांच्या वर आणणे हा आहे. मैत्री 2.0 ही सिंगल विंडो क्लिअरन्स प्रणाली कार्यान्वित करण्यात आली असून, ईव्ही, सेमिकंडक्टर, ग्रीन हायड्रोजन, डेटा सेंटर्स यासारख्या नवक्षेत्रांना प्रोत्साहित करण्यात येत आहे.

2024-25 या पहिल्या तिमाहीत देशात सर्वाधिक 1.39 लाख कोटींची परकीय गुंतवणूक आकर्षित केली आहे. दावोस वर्ल्ड इकॉनॉमिक फोरममध्ये 15.96 लाख कोटींचे सामंजस्य करार केले. त्यातील 50 टक्के प्रस्तावांवर प्रक्रिया सुरु झाली असून, त्यातील अधिकाधिक गुंतवणूक ही दुसऱ्या आणि तिसऱ्या श्रेणीतील शहरांमध्ये होत आहे.

विकासाला गती देण्यासाठी पायाभूत सुविधा, विविध सुधारणा आणि रोजगार वाढविण्यावर आमचा भर आहे. समृद्धी महामार्ग, अटलसेतू, कोस्टर रोड आदी प्रकल्प महाराष्ट्राच्या विकासाला आणि पायाभूत क्षेत्रातील क्रांतीला गती देत आहेत. वाढवण पोर्ट, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, मेट्रो, रेल्वे, मल्टीमॉडेल लॉजिस्टिक पार्क हे क्षेत्रीय विकासाला चालना देणार असून, त्यासाठी आम्ही पंतप्रधान महोदयांचे आभारी आहोत, असं यावेळी देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी म्हटलं.

दरम्यान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी देशाचे नवे सरन्यायाधीश भूषण गवई यांची देखील भेट घेतली. त्यांना विधानमंडळात सर्वपक्षीय सत्कार तसेच, भारतीय संविधान याविषयावर मार्गदर्शनपर व्याख्यानासाठी वेळ देण्याची विनंती यावेळी मुख्यमंत्र्यांनी केली.

# बदलापुरातील दत्त चौकाची ओळख आता नाही मिटणार !



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

बदलापूर : कुळगाव बदलापूर नगर परिषदेकडून शहरात सिग्नल यंत्रणा बसवली जाते आहे. त्यासाठी चौकांची स्वच्छता आणि जागा उपलब्ध करण्यासाठी मोहीम सुरू आहे. या मोहिमेत बदलापूर पश्चिमेतील दत्त चौकात असलेल्या सुमारे १०० वर्षे जुन्या वडाच्या झाडालाही धक्का बसणार होता. हे झाडही हटवण्याची तयारी पालिका प्रशासनाने केली होती. याबाबतची सूचना आणि हरकती मांडण्याची नोटीस कुळगाव बदलापूर नगर परिषदेने एका वृत्तपत्रात प्रसिद्ध केली. दत्त चौकातील वडाचे झाड ही या परिसराची ओळख आहे. हे झाड हटवण्यासाठी हरकत घेण्यात आली. तसे निवेदन मुख्याधिकारी मारूत गायकवाड यांना देण्यात आले. त्यांनीही या हरकतीला गांभीर्याने घेत दत्त चौकातील जुने वडाचे झाड न हटवण्याचा निर्णय घेतला. तशी माहिती त्यांनी प्रेस क्लब ऑफ बदलापूरच्या सदस्यांना फोनद्वारे दिली. या झाडाच्या संगोपनासाठी प्रयत्न करू, त्यासाठी योग्य तो निर्णय घेऊ असे आश्वासनही यावेळी मारुती गायकवाड यांनी दिले,

# सोशल मीडिया प्लॅटफॉर्म 'एक्स' अचानक ठप्प

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**भारत सहित जगभरात लोकप्रिय असलेले सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्स ( माजी ट्वीटर ) शनिवारी सायंकाळी अचानक ठप्प पडले. ज्यामुळे लाखो युजरना मोठा फटका बसला.**

भारतासह जगभरात लोकप्रिय असलेली मायक्रो ब्लॉगिंक साईट एक्स ( आधीचे ट्वीटर ) शनिवारी सायंकाळी अचानक ठप्प झाली. त्यामुळे एक्सचे जगभरातील युजरना अडचणींना सामोरे जावे लागले. या एक्स साईटवर तास ते दीड तास गोंधळ उडाला. या साईटवरील सर्व पोस्ट करण्यात अडचणी येऊ लागला.

भारत सहित जगभरात लोकप्रिय असलेले सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्स ( माजी ट्वीटर ) शनिवारी सायंकाळी अचानक ठप्प पडले. ज्यामुळे लाखो युजरना मोठा फटका बसला. अनेक युजरना लॉग इन करण्यात मोठी अडचणी येऊ लागल्या. अनेक युजरना नवीन पोस्ट करण्यात अडचणी येऊ लागल्या.



एक्स डाऊन का झाले याचे कोणतेही कारण समोर आलेले नाही.

हा तांत्रिक बिघाडाचा फटका जगभरातील युजरना जाणवला आणि अनेक देशांतील वापरकर्त्यांनी ट्विटर इतर सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर डाऊन झाल्याची बातमी शेअर केली. भारतातही लाखो युजरना यामुळे समस्यांचा सामना करावा लागला, कारण सध्या X माध्यम हे राजकीय, सामाजिक आणि व्यावसायिक संवादाचे एक महत्त्वाचे माध्यम बनले आहे. काही तास एक्स स्लो डाऊन झाल्यानंतर दीड तासानंतर पुन्हा सेवा बहाल करण्यात आल्याचे निदर्शनास आले.

# ठाण्याचे तलावांचे शहर नाव बदला कचऱ्याचे,डबक्यांचे शहर नाव द्या

## राजन विचारे यांनी पालिका अधिकाऱ्यांना लगावला टोला

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : तलावांचे शहर नाव बदलून कचऱ्याचे आणि डबक्यांचे शहर असे नामकरण करा असा टोला शिवसेना (उबाठा )पक्षाचे नेते, माजी खासदार राजन विचारे यांनी पालिका अधिकाऱ्यांना लगावला.

ठाणे महापालिकेच्या अधिकाऱ्यांच्या समवेत राजन विचारे यांनी आज पहिल्या टप्प्यातील ठाणे शहराचा दौरा केला. यावेळी नाले, रस्ते आणि तलावांची दुरावस्था पाहून विचारे यांनी पालिका अधिकाऱ्यांना चांगलेच धारेवर धरले.

पावसाळ्यापूर्वी झालेली नालेसफाई व तलावांच्या दुरावस्थेबाबत राजन विचारे यांनी दोन दिवसांपूर्वीच पोलखोल केली. त्यानंतर ठाणे महापालिकेच्या अधिकाऱ्यांबरोबर संयुक्त दौरा केला. या दौऱ्याची सुरुवात मासुंदा तलाव येथून करण्यात आली. यामध्ये तलावाच्या आउटलेटची कामे निधी अभावी अपूर्ण स्थितीत असल्याचे निदर्शनास आणून दिले. त्यामुळे पावसाचे पाणी बाजारपेठेत जाऊन दरवर्षी व्यापाऱ्यांचे मोठे नुकसान होणार असल्याची भीती व्यक्त केली. तसेच वंदना डेपो येथील पारस सोसायटी समोरील





नाला कचऱ्याने तुंडूब भरलेला दाखवत ठेकेदार कशी हात की सफाई करतो याचे उदाहरण त्या ठिकाणी अधिकाऱ्यांना दाखवून दिले. या पाहणी दौऱ्यात ठाणे महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे, उपायुक्त मनीष जोशी, प्रदूषण नियंत्रण अधिकारी मनीषा प्रधान, उपनगर अभियंता सुधीर गायकवाड, कार्यकारी अभियंता मोहन कलाल, भगवान शिंदे, वैभव तपकिरी,चंद्रकांत सावंत, स्वच्छता निरीक्षक अधिकारी व इतर अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.कचराळी तलाव येथे इरिगेशन पंप बंद अवस्थेत आहेत, तेथे गावात कसे तयार होते याचे उदाहरण त्यांनी दाखवून दिले. त्यावेळी शिवसेना नेते राजन विचारे अधिकाऱ्यांवर चांगलेच घसरले. ठाणे शहर लेक सिटी नसून डबक्यांची सिटी म्हणून बोर्ड लावा असे अधिकाऱ्यांना त्यांनी ठणकावून सांगितले.

सिद्धेश्वर तलाव परिसरातील रूपादेवी पाडा येथील नाल्यातील साठलेला कचरा निदर्शनास आणून देऊन ऐतिहासिक अशा सिद्धेश्वर तलावाची पाहणी केली. लोकप्रतिनिधी नसल्यामुळे प्रशासनावरील अंकुश सुटल्यामुळे आपल्या मनाप्रमाणे अधिकारी कामे करीत आहेत. सिद्धेश्वर तलावात यापूर्वी अशी परिस्थिती कधीच आली नव्हती. त्यावेळी अधिकाऱ्यांना ही कामे वेळेत पूर्ण करा नाहीतर आंदोलन करावे लागेल असा थेट इशारा दिला आहे.

# २९ जून रोजी कल्याण कृषी उत्पन्न बाजार समितीची निवडणूक

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक मंडळाच्या १८ सभासदांसाठी २९ जून रोजी निवडणुक होणार आहे. उमेदवारी अर्ज २६ ते ३० मे पर्यंत भरता येणार आहेत. अर्जाची छाननी ३ जून रोजी सकाळी ११ वाजता होणार आहे. १७ जूनपर्यंत अर्ज मागे घेता येणार आहेत. निशाणी वाटप व अंतिम उमेदवारांची नावे १८ जून रोजी प्रसिद्ध केली जाणार आहे. प्रत्यक्ष मतदान कल्याण कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात २९ जून रोजी सकाळी ८ ते सायंकाळी ४ वाजेपर्यंत असणार आहे. त्यानंतर मतमोजणी




सुरू केली जाणार आहे. मतमोजणी झाल्यानंतरचा निकाल २९ जून रोजी जाहीर केला जाणार आहे. निवडणूक राज्य प्राधिकरणाचे सचिव अशोक गाडे यांनी हा कार्यक्रम प्रसिद्ध केला असून निवडणूक अधिकारी म्हणून बाजार समितीचे प्रशासक व जिल्हा सहकारी उपनिबंधक डॉक्टर किशोर मांडे कामकाज पाहणार आहे १८ सदस्यांची ही निवडणूक होत असून कृषी पत्व बहुउद्देशीय संस्था यांचे ११ प्रतिनिधी ग्रामपंचायतचे चार प्रतिनिधी व्यापारी अडत्यांचे दोन प्रतिनिधी व हमाल तोलाई यांचा एक प्रतिनिधी या समितीवर निवडला जाणार आहे. पतसंस्थेचे अकरा सभासदांपैकी सर्वसाधारण सदस्य म्हणून सात महिला दोन इतर मागासवर्गीय व विशेष मागासवर्गीय प्रभाग एक असे अकरा सदस्य निवडणुकीसाठी पात्र ठरले आहेत तर ग्रामपंचायतमध्ये प्रत्येकी सर्वसाधारण सदस्य तसेच अनुसूचित जाती जमाती व आर्थिक दुर्बल घटक यांचे एक एक प्रतिनिधी यातून निवडले जाणार आहेत.









# गीतासार



## अध्याय ११
## विश्वरूपदर्शनयोगः

नमः पुरस्तादथ पृष्ठतस्ते
नमोऽस्तु ते सर्वत एव सर्व ।
अनन्तवीर्यामितविक्रमस्त्वं सर्वं
समाप्नोषि ततोऽसि सर्वः
॥ ११-४० ॥

हे अनंत सामर्थ्यशाली, आपल्याला पुढून व मागूनही नमस्कार. हे सर्वात्मका, आपल्याला सर्व बाजूंनीच नमस्कार असो. कारण अनंत पराक्रमशाली अशा आपण सर्व जग व्यापले आहे. म्हणून आपण सर्वरूप आहात. ॥ ११-४० ॥

सखेति मत्वा प्रसभं यदुक्तं
हे कृष्ण हे यादव हे सखेति ।
अजानता महिमानं तवेदं मया
प्रमादात्प्रणयेन वापि ॥ ११-४१
॥ यच्चावहासार्थमसत्कृतोऽसि
विहारशय्यासनभोजनेषु ।
एकोऽथवाप्यच्युत तत्समक्षं
तत्क्षामये त्वामहमप्रमेयम्
॥ ११-४२ ॥

आपला हा प्रभाव न जाणवल्यामुळे, आपण माझे मित्र आहात असे मानून प्रेमाने किंवा चुकीने मी हे कृष्णा, हे यादवा, हे सख्या, असे जे काही विचार न करता मुद्दाम म्हटले असेल, आणि हे अच्युता, माझ्याकडून विनोदासाठी फिरताना, झोपताना, बसल्यावेळी आणि भोजन इत्यादी करताना आपला एकांतात किंवा त्या मित्रांच्या समक्ष जो अपमान झाला असेल, त्या सर्व अपराधांची अचिंत्य प्रभावशाली अशा आपणाकडे मी क्षमा मागत आहे.
॥ ११-४१, ११-४२ ॥

पितासि लोकस्य चराचरस्य
त्वमस्य पूज्यश्च गुरुर्गरीयान् । न
त्वत्समोऽस्त्यभ्यधिकः कुतोऽन्यो
लोकत्रयेऽप्यप्रतिमप्रभाव
॥ ११-४३ ॥

आपण या चराचर जगताचे जनक आहात. तसेच सर्वश्रेष्ठ गुरू व अत्यंत पूजनीय आहात. हे अतुलनीयप्रभावा, त्रैलोक्यात आपल्या बरोबरीचाही दुसरा कोणी नाही. मग आपल्याहून श्रेष्ठ कसा असू शकेल? ॥ ११-४३ ॥

# जागतिक थायरॉईड दिन

जागतिक थायरॉईड दिन हा दरवर्षी २५ मे रोजी साजरा केला जाणारा एक जागतिक आरोग्य सेवा कार्यक्रम आहे, ज्याचा उद्देश थायरॉईड रोगाचा भार, रुग्णाचा अनुभव आणि थायरॉईड आजारांच्या आंतरराष्ट्रीय अभ्यास आणि उपचारांसाठी वचनबद्ध असलेल्या सर्वांची ओळख पटवणे आहे.

थायरॉईड रोग हे कदाचित जगभरातील सर्वात प्रचलित अंतःस्रावी विकारांपैकी एक आहेत; भारतही त्याला अपवाद नाही. थायरॉईड रोगावरील विविध अभ्यासातून असे दिसून आले आहे की अंदाजे ४.२ कोटी भारतीय या आजाराने ग्रस्त आहेत.

### जागतिक थायरॉईड दिनाचे महत्त्व (WTD)

थायरॉईड ग्रंथी थायरॉईड संप्रेरके तयार करते जी सामान्य वाढ आणि ऊर्जा चयापचयसाठी आवश्यक असतात. थायरॉईड बिघडलेले कार्य सामान्य आहे, ते सहज ओळखता येते आणि त्यावर उपचार करणे सोपे आहे, परंतु जर निदान झाले नाही किंवा उपचार केले नाहीत तर त्याचे गंभीर प्रतिकूल परिणाम होऊ शकतात.

आग्नेय आशिया आणि दक्षिण अमेरिका ते मध्य आफ्रिका अशा आयोडीनच्या कमतरतेच्या भागात जगभरात १०० कोटींहून अधिक लोक जीवन जगतात. थायरॉईड संप्रेरकांच्या निर्मितीमध्ये आयोडीन हा एक महत्त्वाचा घटक आहे, परंतु त्याचे वितरण जागतिक स्तरावर असमान आहे आणि दुर्गम पर्वतीय प्रदेशांमध्ये ते दुर्मिळ आहे.

आयोडीन कमी असलेल्या लोकसंख्येमध्ये, थायरॉईड बिघडलेले कार्य बहुतेकदा थायरॉईड ऑटोइम्यूनिटीमुळे होते - ज्यामध्ये ग्रेव्हज रोग, हाशिमोटो थायरॉईडायटिस आणि प्रसूतीनंतरचा थायरॉईडायटिस असतो ज्यामध्ये वैशिष्ट्यपूर्ण थायरॉईड-विशिष्ट ऑटोरिॲक्टिव्ह ॲंटीबॉडीज असतात. आयोडीनची कमतरता आणि जास्ती दोन्हीमुळे हायपोथायरॉईडीझम तसेच हायपरथायरॉईडीझम होऊ शकतो. साथीच्या अभ्यासातून असे दिसून आले आहे की १% पुरुष आणि ५% महिलांमध्ये वैद्यकीयदृष्ट्या शोधण्यायोग्य थायरॉईड नोड्यूल असतात आणि वयानुसार आणि आयोडीनची कमतरता असलेल्या समुदायांमध्ये याचे प्रमाण वाढते.

या कठीण काळात, थायरॉईड आजारांबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी आणि त्यावर भर देण्यासाठी एखाद्या कार्यक्रमाचे आयोजन करणे आणि त्याचे आयोजन करणे आवश्यक आहे. असे केल्याने तपासणी, निदान, उपचार आणि शक्य असल्यास, त्यापासून बचाव याबद्दल ज्ञानाचा प्रसार जलद होतो. जागतिक थायरॉईड दिन त्याच्या वाढत्या लोकप्रियतेसह वरील सूचना यशस्वीरित्या साध्य करतो. या थीम्सवरून असे दिसून येते की थायरॉईड समस्या जागतिक स्तरावर सर्वात सामान्य अंतःस्रावी विकारांपैकी एक आहेत, मधुमेहानंतर दुसऱ्या क्रमांकावर आहेत.

### जागतिक थायरॉईड दिनासाठी वर्ष-दर-वर्ष थीम (WTD)

जागतिक थायरॉईड दिन (WTD) २०२३ ची थीम: थायरॉईड आरोग्य: कल्याणाचे पालनपोषण

जागतिक थायरॉईड दिन (WTD) थीम २०२२: हे तुम्ही नाही आहात.



हे तुमचे थायरॉईड आहे.

जागतिक थायरॉईड दिन (WTD) २०२१ ची थीम: आई-बाळ आयोडीन: स्त्री आणि तिच्या बाळावर आयोडीनचे महत्त्व

जागतिक थायरॉईड दिन (WTD) २०१९ ची थीम: सुधारित आरोग्य परिणामांसाठी ते शोधा आणि लवकर उपचार करा

जागतिक थायरॉईड दिन (WTD) २०१८ ची थीम: थायरॉईडच्या चांगल्या व्यवस्थापनासाठी जीवनशैली आणि आहारात बदल

### जागतिक थायरॉईड दिनाचा इतिहास (WTD)

सप्टेंबर २००७ मध्ये थायरॉइड फेडरेशन इंटरनॅशनलच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत, २५ मे रोजी "जागतिक थायरॉइड दिन" साजरा करण्याचा निर्णय घेण्यात आला. पहिला जागतिक थायरॉइड दिन २००८ मध्ये साजरा करण्यात आला आणि थायरॉइड फेडरेशन इंटरनॅशनलने कधीही अधिकृतपणे हा कार्यक्रम आयोजित केला नाही, परंतु विविध सदस्य संघटनांचे जगभरात कार्यक्रम होतात. युरोपियन थायरॉईड असोसिएशनने २५ मे २००८ रोजी संघटनेच्या वर्धापन दिनानिमित्त पहिला "युरोपियन थायरॉईड दिन" जाहीर केला, ज्यामुळे युरोपमधील थायरॉईड गट आणि नेटवर्कना यापुढे त्या दिवशी कार्यक्रम आयोजित करण्यास प्रोत्साहित केले गेले.

### थायरॉईड रोगांचे प्रकार

थायरॉईड रोग त्यांच्या निदान, उपचार आणि दृश्यमानतेमध्ये अद्वितीय आहेत. प्रभावी व्यवस्थापनासाठी लवकर निदान आणि उपचार अत्यंत महत्त्वाचे आहेत. पाच सर्वात महत्त्वाच्या थायरॉईड रोगांमध्ये हायपोथायरॉईडीझम, हायपरथायरॉईडीझम, गलगंड / आयोडीनच्या कमतरतेचे विकार, हाशिमोटो थायरॉईडायटीस आणि थायरॉईड कर्करोग यांचा समावेश आहे.

**हायपोथायरॉईडीझम (थायरॉईड संप्रेरकाचे कमी उत्पादन):** हे सर्व वयोगटातील व्यक्तींना प्रभावित करू शकते. जन्मजात हायपोथायरॉईडीझमचे मेंदूचे नुकसान टाळण्यासाठी लवकर निदान आणि थेरपी आवश्यक आहे, जे भारतात सामान्य आहे आणि २६४० नवजात मुलांपैकी १ मध्ये होते. जागरूकता आणि तपासणी कार्यक्रमांचा अभाव हे निदान उशिरा होण्यास कारणीभूत घटक आहेत.

**हायपरथायरॉईडीझम (थायरॉईड संप्रेरकाचे वाढलेले उत्पादन):** हे थायरॉईड ग्रंथीच्या अतिक्रियाशील कार्यामुळे होते, ज्यामुळे शरीरातील चयापचय गतिमान होते. हायपरथायरॉईडीझमची लक्षणे म्हणजे वजन कमी होणे, हात थरथरणे, जलद किंवा अनियमित हृदयाचे ठोके इत्यादी.

गलगंड (थायरॉईड ग्रंथीचा विस्तार, थायरॉईडच्या कार्यात्मक बदलाशी संबंधित असू शकतो/नसू शकतो): भारतीय संशोधनाने आयोडीनची कमतरता आणि स्थानिक गलगंड यांच्यातील संबंध स्थापित केला आहे, विशेषतः हिमालयीन प्रदेशांमध्ये. नवजात मुलांमध्ये आयोडीनची कमतरता हायपोथायरॉईडीझमशी संबंधित असल्याचे दिसून आले, ज्यामुळे भारत सरकारने मीठ आयोडिनीकरण कार्यक्रम लागू केला. उत्तर प्रदेशात जन्मजात हायपोथायरॉईडीझमचा प्रसार कमी करण्यात हा कार्यक्रम यशस्वी झाला आहे.

हाशिमोटोचा थायरॉईडायटीस (याला हाशिमोटोचा आजार देखील म्हणतात) - एक ऑटोइम्यून रोग ज्यामध्ये शरीराच्या रोगप्रतिकारक पेशी थायरॉईड ग्रंथीवर हल्ला करतात): एका भारतीय अभ्यासात असे आढळून आले की गलगंड असलेल्या मुलींमध्ये, ७.५% मुलींना किशोरवयीन ऑटोइम्यून थायरॉईडायटीस (ज्यामध्ये हाशिमोटोचा थायरॉईडायटीस समाविष्ट आहे) होता.

थायरॉईड कर्करोग : एक असा विकार ज्यामध्ये थायरॉईड ग्रंथीच्या ऊतींमध्ये घातक (कर्करोगाच्या) पेशी विकसित होतात. थायरॉईड नोड्यूल वारंवार आढळतात; तथापि, ते नेहमीच कर्करोगाचे नसतात. थायरॉईड कर्करोगाचे अनेक प्रकार आहेत. थायरॉईड कर्करोगाचा धोका वय, लिंग आणि रेडिएशनच्या संपर्कामुळे प्रभावित होऊ शकतो.

### थायरॉईड रोग टाळण्यासाठी टिप्स

थायरॉईड रोग टाळण्यासाठी काही टिप्स आहेत. त्यामध्ये विविध जीवनशैली घटक आणि वर्तनांचा अवलंब करणे समाविष्ट आहे, जसे की: पुरेशा आयोडीन, सेलेनियम आणि लोहाच्या सेवनासह निरोगी आहार राखणे, धूम्रपान टाळणे, जास्त मद्यपान टाळणे, ताण व्यवस्थापन पुरेशी गाढ झोप घेणे, आणि व्हिटॅमिन डीची पुरेशी पातळी राखण्यासाठी सुरक्षित सूर्यप्रकाशाचा सराव करणे.

याव्यतिरिक्त, कोणत्याही संभाव्य थायरॉईड विकारांचे लवकर निदान आणि उपचार करण्यासाठी नियमित तपासणी आणि थायरॉईड कार्याचे निरीक्षण करणे महत्वाचे आहे.

# डोंबिवलीतील
## श्रीधर म्हात्रे वाडीत मोफत हेअर कलर कार्यक्रम




दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

डोंबिवली : कल्याण डोंबिवली महानगर पालिका प्रभाग क्रमांक ४८, ५९ आणी ६१ मधील महिला व पुरुषांसाठी माजी जेष्ठ नगरसेवक तथा माजी स्थायी समिती सभापती जनार्दन म्हात्रे आणि ह प्रभाग सभापती रेखा जनार्दन म्हात्रे यांनी मोफत हेअर कलर कार्यक्रम आयोजित केला. या कार्यक्रमासाठी प्रभागातील लोक मोठ्या संख्येने सहभागी होवुन शेकाडोच्या संख्येने लोकांनी याचा लाभ घेतला.

शिवसेना जनसंपर्क कार्यालय, श्रीधर म्हात्रे वाडी, कर्वे रोड, डोंबिवली पश्चिम येथे दोन दिवसीय मोफत हेअर कलर उपक्रम घेण्यात आला होता. सदर कार्यक्रमाचे उद्घाटन सिने कलाकार अक्षता दास यांच्या हस्ते करण्यात आले. या उपक्रमाला अनेक मान्यवरांनी भेटी दिल्या. सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी केतकी पवार, अस्मिता खानविलकर, तुषार शिंदे, चंद्रकांत महाजन, जाई ढोले, प्रतिभा नारखेडे, उषा आचरेकर, पल्लवी इंदुरकर, शितल करंडे, ललिता मेहेर, सुनंदा रणसूबे, मलिका बगडिया, प्राची पंडित, संगीता निकम, अमित निलंकर आदींनी विशेष मेहनत घेतली.

याविषयी माजी नगरसेवक जनार्दन म्हात्रे म्हणाले, मे महिन्यात लग्नसराई हंगाम त्याचबरोबर फिरण्यासाठी लोकं बाहेर जाण्याचा बेत करतात. दरम्यान आपण चांगल दिसावं असं प्रत्येकाला वाटत असतं. चांगल दिसण्यामध्ये केसांच्या रंगाने तुम्ही तुमचे व्यक्तिमत्व बदलू शकता आणि एक नवीन लूक मिळवू शकता. केसांना रंग देणे हा केसांना रंग देण्याचा आणि त्यांना एक नवीन लूक देण्याचा एक मार्ग आहे. केसांना रंग देण्याचे अनेक प्रकार आहेत, ज्यात कायमस्वरूपी, अर्ध-कायमस्वरूपी आणि तात्पुरते केसांचा रंग असा उपक्रम आम्ही या मोफत हेअर कलर कार्यक्रम माध्यमातून प्रभागातील महिला तसेच पुरुषांसाठी ठेवला आहे.

# डोंबिवली एमआयडीसी परिसरात भरदिवसा घरफोड्या

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

डोंबिवली : एमआयडीसी निवासी, सुदामा नगर मधील मॉडेल कॉलेज बस स्टॉप जवळ असलेल्या साईदीप सोसायटी ( RH-29 ) मधील A आणि B विंग मधील दोन बंद फ्लॅट मध्ये चोरट्यांनी येऊन घरफोडी केली आहे. काल शुक्रवारी दुपारच्या दरम्यान सदर घरफोड्या भरदिवसा झाल्याने नागरिकांत आता घबराट पसरली आहे.

चोरट्यांनी A विंग मधील पहिला मजला फ्लॅट क्रमांक 7 मध्ये घरफोडी करताना ते सीसी कॅमेऱ्यात कैद झाले असून काही मौल्यवान दागिने, ऐवज व रोख रक्कम चोरीस गेली असल्याचे समजत आहे. दुसरी घरफोडी B विंग मधील दुसरा मजला फ्लॅट क्रमांक 10 मध्ये झाली पण या चोरट्यांना या घरात काही मौल्यवान ऐवज चोरण्यासाठी मिळाला नाही. या घरफोडीची फिर्याद मानपाडा पोलीस ठाण्यात दाखल झाली आहे. एमआयडीसी निवासी मध्ये गेल्या दोन महिन्यात अनेक घरफोड्या झाल्या असल्याने पोलिसांपुढे चोरट्यांना पकडणे आव्हान ठरत आहे.

# एकात्मिक फलोत्पादन विकास कार्यक्रमात सहभागी होण्याचे आवाहन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : एकात्मिक फलोत्पादन विकास कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी शेतकऱ्यांनी महाडीबीटी पोर्टलवर अर्ज करणे आवश्यक आहे. यासाठी आपल्या नजिकच्या आपले सरकार ई-सेवा केंद्रामधे जाऊन किंवा https://mahadbtmahait.gov.in या संकेतस्थळावर अर्ज करावा. अधिक माहितीसाठी गावपातळीवरील कृषी सहाय्यक, कृषी पर्यवेक्षक, मंडळ कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी, उपविभागीय कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा. जास्तीत जास्त शेतक-यांनी फलोत्पादनाशी निगडीत योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी यांनी केले आहे.

एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान सन 2025-26 अंतर्गत फळे, फुले, मसाला लागवड, अळिंबी उत्पादन प्रकल्प व जुन्या फळबागांचे पुनरूज्जीवन हे घटक राबविण्यात येत आहे. यामध्ये विदेशी फळे, फुले, मसाला लागवड व आंबा या फळपिकांच्या जुन्या फळबागांचे पुनरूज्जीवन करणे तसेच अळिंबी उत्पादन प्रकल्प उभारणी करणे या बाबीचा समावेश आहे. जिल्हयामध्ये विदेशी फळे, फुले, मसाला या पिकांचे क्षेत्र व उत्पादन वाढविणे तसेच जुन्या फळबागांची उत्पादकता वाढविणे या दृष्टीने हा कार्यक्रम राबविण्यात येत आहे. या घटकांचे अनुदान खालीलप्रमाणे आहे.

**फुले लागवड**-कट फ्लॉवर्स (गुलाब, ॲस्टर, बर्ड ऑफ पॅराडाईज, हेलिकोनियास, गोल्डन रॉड, शेवंती इ.) खर्च मर्यादा 1 लाख 25 हजार रुपये प्रती हेक्टर, अनुदान मर्यादा एकुण खर्चाच्या 40 टक्के 60:40 या प्रमाणात दोन हप्त्यात, कमाल 50 हजार रुपये प्रती हेक्टर.

**कंदवर्गीय फुले** (निशिगंध, ग्लॅडीओलस, लिलियम, लिलिज, कॅलालिली, डेलिया इ.) खर्च मर्यादा 2 लाख 50 हजार रुपये प्रती हेक्टर, अनुदान मर्यादा एकूण खर्चाच्या 40 टक्के 60:40 या प्रमाणात दोन हप्त्यात, कमाल 1 लाख रुपये प्रती हेक्टर.

**सुटी फुले** (झेंडू, ॲस्टर, गेलाडिया, हेलिक्रायसम, शेवंती, मोगरा, जाई, जुई, झिनिया, बिजली इ.) खर्च मर्यादा 50 हजार रुपये प्रती हेक्टर, अनुदान मर्यादा एकुण खर्चाच्या 40 टक्के 60:40 या प्रमाणात दोन हप्त्यात, कमाल 20 हजार रुपये प्रती हेक्टर.

मसाला पीक लागवड- बिया वर्गीय व कंद वर्गीय मसाला पिके (मिरची, हळद व आले) खर्च मर्यादा 50 हजार रुपये प्रती हेक्टर, अनुदान मर्यादा एकूण खर्चाच्या 40 टक्के 60:40 या प्रमाणात दोन हप्त्यात, कमाल 20 हजार रुपये प्रती हेक्टर.

**बहुवर्षिय मसाला पिके** (काळीमिरी, कोकम इ.) खर्च मर्यादा 1 लाख रुपये प्रती हेक्टर. अनुदान मर्यादा एकुण खर्चाच्या 40 टक्के 60:40 या प्रमाणात दोन हप्त्यात, कमाल 40 हजार रुपये प्रती हेक्टर.

**विदेशी फळपीक लागवड**- ड्रॅगनफ्रूट खर्च मर्यादा 6 लाख 75 हजार रुपये प्रती हेक्टर, अनुदान मर्यादा एकूण खर्चाच्या 40 टक्के 60:40 या प्रमाणात दोन हप्त्यात, कमाल 2 लाख 70 हजार रुपये प्रती हेक्टर.

**स्ट्रॉबेरी** खर्च मर्यादा 2 लाख रुपये प्रती हेक्टर, अनुदान मर्यादा एकूण खर्चाच्या 40 टक्के 60:40 या प्रमाणात दोन हप्त्यात, कमाल 80 हजार रुपये प्रती हेक्टर.

**अव्हॅकॅडो** खर्च मर्यादा 1 लाख 25 हजार रुपये प्रती हेक्टर, अनुदान मर्यादा एकूण खर्चाच्या 40 टक्के 60:40 या प्रमाणात दोन हप्त्यात, कमाल 50 हजार रुपये प्रती हेक्टर.

**जुन्या फळबागांचे पुनरूज्जीवन**- जुन्या फळबागांचे पुनरूज्जीवन खर्च मर्यादा 60 हजार रुपये प्रती हेक्टर, अनुदान मर्यादा खर्चाच्या 40 टक्के व जास्तीत जास्त 24 हजार रुपये प्रती हेक्टर.

**अळिंबी**- अळिंबी उत्पादन प्रकल्प खर्च मर्यादा 30 लाख प्रती युनिट, अनुदान मर्यादा खर्चाच्या 40 टक्के व जास्तीत जास्त 12 लाख रुपये प्रती युनिट. अळिंबी बीज उत्पादन केंद्र खर्च मर्यादा 20 लाख प्रती हेक्टर, अनुदान मर्यादा खर्चाच्या 40 टक्के व जास्तीत जास्त 12 लाख रुपये प्रती युनिट.

बटन अळिंबी उत्पादनासाठी कंपोस्ट प्रकल्प खर्च मर्यादा 30 लाख प्रती युनिट, अनुदान मर्यादा खर्चाच्या 40 टक्के व जास्तीत जास्त 12 लाख रुपये प्रती युनिट.

कमी खर्चाचे अळिंबी उत्पादन केंद्र 2 लाख प्रती युनिट, अनुदान मर्यादा खर्चाच्या 50 टक्के व जास्तीत जास्त 1 लाख रुपये प्रती युनिट.

# गोल्डन बॉयचे स्वप्न साकार

९० मीटर भाला फेकण्याचे भारताचा गोल्डन बॉय ऑलिम्पिक सुवर्णपदक विजेता भालाफेकपटू नीरज चोप्राचे स्वप्न साकार झाले आहे. नीरज चोप्राने दोहा डायमंड लीगमध्ये ही अभिमानास्पद कामगिरी केली आहे. दोहा डायमंड लीगमध्ये तिसऱ्या प्रयत्नात ९०.२३ मीटर भाला फेकत नीरजने स्वप्न साकार केले आहे. ९० मीटर भाला फेकून त्याने स्वतःचाच राष्ट्रीय विक्रमही मोडला आहे. त्याची ही कामगिरी ऐतिहासिक अशीच आहे कारण ९० मीटर भाला फेकणारा तो भारताचा पहिलाच भालाफेक पटू ठरला असून अशी कामगिरी करणारा तो जगातील केवळ दुसरा भालाफेकपटू आहे. ९० मीटर भालाफेकणे हे कोणत्याही भालाफेकपटूचे स्वप्न असते तसे ते निरजचेही होते. आपल्या कारकीर्दीत ९० मीटर फेकण्याचे स्वप्न नीरज ने पाहिले आणि त्याने ते साकार केले आणि ते सत्यात उतरवले याबद्दल नीरजचे मनापासून अभिनंदन! याआधी त्याने अनेकदा प्रयत्न केला पण त्याला ९० मीटर भाला फेकत आला नव्हता मागील वर्षीच त्याने लॉसने डायमंड लीगमध्ये पहिलं स्थान पटकावलं होतं. त्यात त्याने ८७.६६ मीटर अंतरावर भालाफेकला होता. त्याचा या ऐतिहासिक कामगिरीने देशातील १४४ कोटी जनतेची मान उंचावली आहे अर्थात अशी ऐतिहासिक कामगिरी करण्याची त्याची ही पहिली वेळ नाही याआधी तीन वर्षांपूर्वी नीरज चोप्राने टोकियो ऑलिंपिकमध्ये विक्रमी भालाफेक करून सुवर्णपदक जिंकून इतिहास घडवला होता. विशेष म्हणजे ॲथलॅटीक्समध्ये भारताला मिळालेले हे पहिलेच पदक होते. याआधी मिल्खा सिंग, पी टी उषा हे पदकाच्या जवळ पोहचूनही पदकाला गवसणी घालू शकले नव्हते ती किमया नीरजने करून दाखवली होती. भारतासाठी ऑलिम्पिकमध्ये सुवर्णपदक आणि दोनदा डायमंड लीग स्पर्धा जिंकणाऱ्या नीरज चोप्राचा जन्म २७ डिसेंबर १९९७ ला हरियाणातील पानिपत जिल्ह्यातील खांद्रा या छोट्याशा गावात एका सर्वसामान्य शेतकरी कुटुंबात झाला. त्याचे




शिक्षण चंदीगड येथे झाले. लहानपणापासून त्याला खेळाची आवड होती. त्याचे वजन ८० किलो होते त्यामुळे गावातील लोक त्याला सरपंच म्हणत. कुस्ती, कबड्डी असे खेळ त्या गावातील मुले खेळत पण नीरजने मात्र भालाफेक या खेळाची निवड केली. विशेष म्हणजे त्याच्या गावात कोणीही भालाफेक हा खेळ खेळत नव्हते. भाला फेक हा खेळ जागतिक स्तरावर खेळला जातो हे देखील त्या गावातील काही लोकांना माहीत नव्हते त्यामुळे अनेकांनी त्याला भालाफेक सोडून कुस्ती हा खेळ खेळण्यास सांगितले. नीरजने मात्र त्याकडे दुर्लक्ष करून भालाफेकीतच करियर करायचे आणि देशाचे नाव उज्ज्वल करायचे असा निश्चय केला. त्यासाठी त्याने तंदुरुस्तीवर भर दिला. खूप प्रयत्न करून स्वतःचे वजन कमी केले. भालाफेकीचा दररोज सराव केला. खेळात सातत्य ठेवले आणि दिवसेंदिवस चांगली कामगिरी केली. राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत चांगली कामगीरी केल्याने २०१६ साली दिल्लीत झालेल्या आशिआई स्पर्धेत भारतीय पथकात त्याची निवड झाली. आपल्या या पहिल्याच आंतरराष्ट्रीय स्पर्धेत त्याने भारताला सुवर्णपदक मिळवून दिले. त्यानंतर २०१६ मध्येच पोलंडमध्ये झालेल्या २० वर्षाखालील वर्ल्ड चॅम्पियनशिपमध्ये ८४. ४८ मीटर दूर भाला फेकून सुवर्णपदक मिळवले. अंजु बॉबी जॉर्ज नंतर आंतरराष्ट्रीय स्पर्धेत एथलॅटीक्समध्ये भारताला पदक मिळवून देणारा नीरज हा दुसराच भारतीय खेळाडू ठरला होता. एकाच वर्षात दोन महत्वाच्या स्पर्धेत सुवर्णपदक जिंकल्याने त्याचे जगभर नाव झाले. या कामगिरीनंतर नीरजची भारतीय सेनेत ज्युनियर कंडिशन ऑफिसर म्हणून नेमणूक करण्यात आली. २०१८ साली जकार्ता येथे झालेल्या एशियन गेम्समध्ये त्याने ८८.०७ मीटर भाला फेकून राष्ट्रीय विक्रमासह सुवर्णपदक जिंकले. सतत चांगली कामगिरी करणाऱ्या नीरजला २०१९ मध्ये मात्र दुखापतीने घेरले. त्याच्या खांद्यावर शस्त्रक्रिया करावी लागली त्यामुळे त्याला काही महिने खेळापासून दूर राहावे लागले. २०२० साली जगभर कोरोनाचा प्रादुर्भाव वाढला त्यामुळे त्याला सक्तीची विश्रांती घ्यावी लागली. त्यामुळे त्याच्या ऑलिम्पिक तयारीवरही मोठा परिणाम झाला असे असतानाही या ऑलिम्पिकमध्ये भारताला पदक मिळवून द्यायचेच या निश्चयाने तो मैदानात उतरला. पहिल्या प्रयत्नातच त्याने ८७.०३ मीटरवर भाला फेकून आघाडी मिळवली. दुसऱ्या प्रयत्नात नीरजने ८७.५८ मीटर भाला फेकत पहिल्या प्रयत्नाच्या तुलनेत सुधारणा केली तिसऱ्या प्रयत्नात नीरजचा भाला ७६.७९ मीटरवर गेला. त्याचा चौथा आणि पाचवा प्रयत्न मात्र अवैध ठरला. मात्र बाकी स्पर्धकांची कामगिरी सर्वसाधारण राहिली त्यामुळे नीरजची आघाडी कायम राहिली. सहाव्या प्रयत्नात नीरजने ८४.२४ मीटर अंतरावर भाला फेकून सुवर्णपदकाला गवसणी घातली. त्याचे सुवर्णपदक निश्चित झाले की देशवासीयांनी दिवाळीच साजरी केली होती आजही तोच उत्साह देशवासीयांमध्ये आहे. ९० मीटर भाला फेकणारा भारतातील पहिला व जगातील दुसरा भालाफेकपटू ठरलेल्या निरजच्या यशाने देशातील १४४ कोटी देशवासियांची छाती अभिमानाने फुगली आहे. ९० मीटर भाला फेकण्याचे स्वप्न साकार करणाऱ्या नीरज चोप्राचे मनापासून अभिनंदन!

- श्याम ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५

# रेसिपी
## कैरी चिली सॉस



**साहित्य :** एक मोठी कैरी सोलून बारीक तुकडे करून, ५ चमचे साखर, दोन चमचे तिखट, एक चमचा बडिशेप, एक चमचा जिरे, एक चमचा मिरे पावडर, अर्धा चमचा मीठ, ४ चमचे पाणी

**कृती:** सर्व साहित्य जाड बुडाच्या कढईत ठेवून मंद आचेवर ठेवावे. सारखे हलवत रहावं. साखर विरघळली की गॅस बारीक करून झाकण ठेवून एक वाफ काढावी. लगेच गॅस बंद करावा.

२ मिनिटांनी झाकण काढून सगळे हलवावं. पूर्ण गार होऊ द्यावे. मग मिक्सरमधे फिरवून एकजीव करावे.काचेच्या बरणीत ठेवावे. हा कैरी चिली सॉस आंबट, तिखट, गोड चवीचा - कशाही बरोबर खाऊ शकता. गुजराथी छुंद्याच्या जवळपास जाणारी चव. तिखट साखर याचे प्रमाण आपल्या आवडीनुसार आणि कैरीच्या आंबटपणानुसार कमी जास्त करू शकता. बडिशेप अन मिरे यामुळे एक वेगळी चव येते.

नियमित वाचा
दैं. ठाणे
जीवनदीप वार्ता

news.thanejeevandeep@gmail.com
दैनिक ठाणे जीवनदीप
WhatsApp Channels
महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक
दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर
मुख्य संपादक : रवींद्र नारायण घोडविंदे
कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम. डी.)
9619188558 / 9082664781
www.jeevandeepvarta.com/
आपलं हक्काचं दैनिक, दररोज वाचा.

जीवनदीप शैक्षणिक संस्था, पोई संचलित
जीवनदीप महाविद्यालय, गोवेली
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, गोवेली
मुंबई विद्यापीठाशी कायम संलग्न, नॅक मुल्यांकन (B- Grade) प्राप्त
११ वी व १२ वी
कला, वाणिज्य, विज्ञान (IT / CS)
UNDER GRADUATION: B.Sc Data Science, B.Sc IT, B.Sc Chemistry Maths, BMS, BAF, B.Com, BAMMC, B.A.
POST GRADUATION: M.Sc IT, M.Sc Chemistry, M.Com Advanced Accountancy, MAMMC, M.A. Marathi, M.A. Economics, M.A. History, M.A. Sociology, M.A. Geography
Admission Open 2025-2026
आपलं कॉलेज, हक्काचं कॉलेज
आजच आपला प्रवेश निश्चित करा!
7775851123, 8108559566
9619188558

# जागतिक पर्यावरण दिन पूर्वतयारीची बैठक संपन्न

## केडीएमसी क्षेत्रात फक्त वृक्षारोपणच नाही, तर पर्यावरणाचा उत्सव साजरा होणार



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : जागतिक पर्यावरण दिन २०२५ च्या अनुषंगाने महापालिकेच्या मा. स्थायी समिती सभागृहात महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांच्या अध्यक्षतेखाली एका बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीस पर्यावरण विभागाच्या कार्यकारी अभियंता रोहिणी लोकरे ,घनकचरा व्यवस्थापन व पर्यावरण विभागाचे उपायुक्त अतुल पाटील , शिक्षणाधिकारी विजय सरकटे, महापालिकेचे ब्रँड अँबेसिडर डॉ. प्रशांत पाटील, विविध खाजगी शाळांचे प्रतिनिधी आणि पर्यावरण क्षेत्रातील स्वयंसेवी संस्थाचे प्रतिनिधी (NGOs) सहभागी झाले होते.

दरवर्षी ५ जून हा जागतिक पर्यावरण दिन म्हणून साजरा केला जातो. यावर्षी संयुक्त राष्ट्र पर्यावरण कार्यक्रम (UNEP) यांनी "जागतिक स्तरावर प्लास्टिक प्रदूषणाचे निर्मूलन (Ending Plastic Pollution Globally)." ही थीम जाहीर केलेली आहे, या पार्श्वभूमीवर, पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालय (MoEF&CC) यांनी २२ मे ते ५ जून २०२५ या कालावधीत देशभरात जनजागृतीसाठी विशेष मोहीम राबविण्याचे निर्देश दिले आहेत त्यामुळे फक्त प्रतीकात्मक झाडे लावणे किंवा प्लास्टिक निर्मूलन याव्यतिरिक्त क्षेत्रनिहाय, नागरिकांच्या सहभागाने वेळापत्रकाची आखणी करून दस्तऐवजीकरणासह एक संपूर्ण मोहीम राबवावी असे निर्देश महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांनी या बैठकीत दिले. झाडे लावण्याचे क्षेत्रनिहाय नियोजन करून त्याची तारीखनिहाय अंमलबजावणी करावी आणि यात नागरिकांच्या सक्रिय सहभागवर भर देण्यात यावा असे ते पुढे म्हणाले.

ही मोहीम वेगवेगळया अभिनव पद्धतीने राबविण्यात येणार असून यामध्ये प्रत्येक महिन्यात, त्या-त्या महिन्याच्या संकल्पनेस अनुरूप उपक्रम राबविण्याचे नियोजन करावे असे निर्देश त्यांनी या बैठकीत दिले .

(उदा. – गणेशोत्सवात 'शाडू मातीच्या मूर्ती' कार्यशाळा, राखी पौर्णिमेला वनबंधुत्व रक्षण दिन इ.)

सर्व शाळांचे शिक्षक व मुख्याध्यापक यांना आमंत्रित करून, हे उपक्रम शाळांमध्येही राबवावेत, जेणेकरून विद्यार्थ्यांमध्ये लहान वयातच पर्यावरणीय जाणीव निर्माण होईल असेही ते पुढे म्हणाले.

शैक्षणिक व पर्यावरणीय दोन्ही दृष्टिकोनातून उपयुक्त ठरेल असे "Seed Bank" प्रदर्शन सार्वजनिक ठिकाणी लावण्याची संकल्पना देखील या बैठकीत उपस्थितांतर्फे मांडण्यात आली.

कल्याण- डोंबिवली महानगर पालिकेतर्फे पर्यावरण दिन साजरा करताना केवळ प्रतिकात्मकता न ठेवता, जास्तीत जास्त नागरिकांच्या सहभागाने ही मोहीम राबविण्याचा संकल्प करावा असेही निर्देश आयुक्त अभिनव गोयल यांनी या बैठकीत दिले.यावेळी महापालिकेच्या कार्यकारी अभियंता रोहिणी लोकरे आणि उपायुक्त अतुल पाटील यांनी सर्व सहभागी सदस्यांना सोबत घेऊन हा उपक्रम राबविण्यात येणार असल्याचे सांगितले.

# पावसाळ्यासाठी आपत्कालीन यंत्रणा सज्ज

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण: यावर्षीच्या पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर कल्याण डोंबिवली महापालिकेची आपत्कालीन यंत्रणा सज्ज आहे. याविषयी अधिकारी कर्मचारी वर्गास आचार्य अत्रे रंगमंदिर येथे प्रशिक्षण देखील देण्यात आले असल्याची माहिती आपत्कालीन व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त संजय जाधव यांनी दिली आहे. केडीएमसी आयुक्त अभिनव गोयल यांच्या निर्देशानुसार महापालिकेच्या दहा प्रभागात आपत्ती व्यवस्थापन केंद्र उभारण्यात आली असून या ठिकाणी सहा. आयुक्त यांचे अधिनस्त सर्व संबंधित विभागातील अधिकारी कर्मचारी यांची नेमणूक करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे प्रत्येक प्रभागातील आपत्कालीन परिस्थितीवर पर्यवेक्षण आणि नियंत्रण ठेवण्यासाठी नोडल अधिकारी म्हणून प्रभाग निहाय उपायुक्त वर्गाची नेमणूक करण्यात आली आहे. महापालिका मुख्यालयातही (आपत्कालीन) मुख्य नियंत्रण कक्ष कार्यान्वित झाला आहे. हा कक्ष ३० ऑक्टोबरपर्यंत कार्यरत राहणार आहे. हा मुख्य नियंत्रण कक्ष सकाळी ६ ते २ दुपारी २ ते रात्री १० आणि रात्री १० ते सकाळी ६ या तीन सत्रात सुरू राहणार आहे. या मुख्य नियंत्रण कक्षावर रात्रीच्या सत्रात अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात आली आहे. नागरिकांच्या सुविधेसाठी महापालिका मुख्यालयातील मुख्य नियंत्रण कक्षात १८००२३३७३८३ आणि १८००२३३४३९२ हे टोल फ्री क्रमांक उपलब्ध करण्यात आले आहेत.

# किरकोळ वादातून मजुरावर चाकूचा वार

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

भिवंडी: एका मजुराने त्याच्या ओळखीच्या तरुणाची चेष्टा केली असता तरुणाने मजुराला शिवीगाळ केल्याने मजुराने तरुणाच्या कानशिलात मारल्याने त्यांच्यात शाब्दिक बाचाबाची झाली. यात तरुणाने मजुराला चाकूने भोसकून गंभीर जखमी केल्याची घटना बाबला कंपाऊंडमधून समोर आली आहे. याप्रकरणी तरुणाच्या विरोधात शांतीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मौला सत्तार शेख (३३) असे जखमी मजुराचे नाव आहे. तर आरोपी तरुण हा मजुराच्या तोंड ओळखीचा आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मौला आणि त्याच्या तोंड ओळखीचा इसम २१ मे रोजी बाबला कंपाऊंड येथील भेळीच्या हातगाडीजवळ असताना मौलाने त्याच्या सोबत असलेल्या तोंड ओळखीतील इसमाला चेष्टेने हात लावला. या गोष्टीचा राग मनात धरून त्या इसमाने मौला यास शिवीगाळ केली असता मौलाने इसमाच्या चापट मारली. त्यामुळे त्यांच्यात शाब्दिक बाचाबाची होऊन ओळखीतील इसमाने मजुराच्या कमरेत चाकूने भोसकून त्यास गंभीर जखमी केले आहे. याप्रकरणी तोंड ओळखीच्या इसमाच्या विरोधात शांतीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# आदर्श शिक्षक समितीच्या राज्याध्यक्षपदी प्रसाद म्हात्रे



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : महाराष्ट्रातील एक नामवंत संघटना महाराष्ट्र राज्य आदर्श शिक्षक समिती या संघटनेच्या राज्याध्यक्षपदी प्रसाद अनंत म्हात्रे (रायगड) व राज्य सरचिटणीस पदी आर आर जोशी (जालना) यांची निवड झालेली आहे. महाराष्ट्रातील श्रमिक संघ अधिनियम १९२६ नुसार पहिली मान्यताप्राप्त ही प्राथमिक शिक्षक संघटना असून शिक्षकांच्या प्रश्नांसाठी कायम कार्यरत असणारी ही महाराष्ट्रातील संघटना आहे.

२० मे २०२५ रोजी छत्रपती संभाजी नगर येथे झालेल्या महामंडळ सभेत संस्थापक दिलीप ढाकणे, राज्यनेते अंकुश काळे, रामदास सांगळे, माजी राज्याध्यक्ष शिवाजीराव साखरे, माजी सरचिटणीस अंजुम पठाण, रविंद्र अंभोरे, महिला आघाडीच्या दीपा देशपांडे, माधव लातूरे यांच्या उपस्थितीत निवड करण्यात आली.

प्रसाद म्हात्रे यांच्या राज्याध्यक्षपदी निवड होण्यासाठी रायगड जिल्ह्याचे अध्यक्ष अजय कापसे, सचिव सुरेंद्र मनवे, कार्याध्यक्ष भालचंद्र पाटील, सौ.अमिता बामणे, नारायण गायकर , आनंद पाटील, संतोष मालुरे, सतीश पाटील , संतोष यादव, किशोर जाधव ,विनायक शिंदे ,सुशांत यसवारे, अविनाश पाटील, गजानन मालकर, मधुकर तांबोळी, जयवंत पाटील, श्रीकृष्ण खंदारे, संतोष शेवाळे, बाळकृष्ण कोठेकर, गणेश सपकाळ ,हेमंत पाटील,पांडुरंग म्हात्रे, मनोज ठाकूर,दयानंद ठाकूर, भारत वाढवल, राजाराम शिंदे,प्रसाद साळवी आदींनी एकमताने पाठिंबा दिला.

# एलिम्को तर्फे दिव्यांग व ज्येष्ठांसाठी आरोग्य तपासणी शिबीर

## खासदार डॉ. श्रीकांत एकनाथ शिंदे यांचे प्रयत्न



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

डोंबिवली : कल्याण लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉक्टर श्रीकांत. शिंदे यांच्या प्रयत्नाने केंद्र सरकारच्या भारतीय कृत्रिम अंग निर्माण निगम (एलिम्को) मार्फत दिव्यांग बांधव व ज्येष्ठ नागरिकांसाठी डोंबिवली शहर मध्यवर्ती शाखेत दोन दिवसीय तपासणी शिबिरास शनिवारी सुरुवात झाली.

हे शिबिर २४ व २५ मे २०२५ रोजी सकाळी १०:०० ते संध्याकाळी ५:०० या वेळेत सुरू राहणार आहे..या शिबिरात प्रमाणपत्रधारक अस्थिव्यंग, बहुविकलांग, सेरेब्रल पाल्सी, कर्णबधिर, पूर्णतः अंध अशा दिव्यांग बांधवांसाठी तसेच ६० वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांसाठी गरजेनुसार विविध सहाय्यक साहित्य तपासणीनंतर मोफत प्रदान करण्यात येणार आहे. या साहित्यांमध्ये तीन चाकी सायकल, व्हीलचेअर, बॅटरी संचालित मोटराईज्ड सायकल, कुबड्या, वॉकिंग स्टिक, सीपी चेअर, श्रवणयंत्र, ब्रेल साहित्य, स्मार्टफोन, कृत्रिम अवयव, तसेच ज्येष्ठ नागरिकांसाठी व्हीलचेअर, कमोड खुर्ची, ट्रायपॉड, ग्रीवा कॉलर, डेन्चर, एल.एस. बेल्ट इत्यादींचा समावेश आहे. उपस्थित डॉक्टर व एलिम्को स्टाफमार्फत पात्र लाभार्थ्यांची वैद्यकीय तपासणी करून साहित्य वितरणाबाबत निर्णय घेतला जात आहे. शिबिरात सहभागी ज्येष्ठ नागरिक व दिव्यांग बांधवांना केंद्र सरकारच्या योजनेचा लाभ मिळावा याकरिता कल्याण ग्रामीण विधानसभा मतदारसंघाचे आमदार श्री राजेश मोरे यांच्या वतीने उत्पन्नाच्या दाखल्याचे वाटप करून मोलाचे सहकार्य करण्यात आले.

या शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख गोपाळ लांडगे, जिल्हा महिला संघटक लताताई पाटील, उपजिल्हाप्रमुख रवी पाटील, राजेश कदम, जिल्हा संपर्कप्रमुख विवेक खामकर, महिला आघाडीच्या कविताताई गावंड, तालुका प्रमुख महेश पाटील, कल्याण तालुका कल्याण तालुका संघटक अर्जुन पाटील, सहकार्यालय प्रमुख बालन मोरे, धर्मराज शिंदे, शैलेंद्र भोजने, माजी नगरसेवक संजय पावशे, कल्याण ग्रामीण तालुका महिला संघटक कल्पना पाटील, उपशहर प्रमुख दिनेश शिवलकर, उपशहर संघटक संतोष तळाशीलकर, उपशहर प्रमुख दीपक भोसले, विधानसभा प्रमुख व शहर सचिव संतोष चव्हाण, महानगर प्रमुख सारिका चव्हाण, खासदार कार्यालयाचे प्रकाश माने इतर कर्मचारी आणि शिवसेनेचे अनेक महिला पुरुष पदाधिकारी / कार्यकर्ते, समाजसेवक, दिव्यांग भगिनी, ज्येष्ठ नागरिक संघांचे प्रतिनिधी व मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# उल्हासनगरात काँग्रेसतर्फे तिरंगा रॅलीचे आयोजन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

उल्हासनगर : उल्हासनगर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या स्वर्गीय राजीव गांधीजींच्या स्मृती दिनानिमित तिरंगा रॅली काढण्यात आली या रॅलीत शहीद जवानांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. काँग्रेसच्या वतीने सपना गार्डन, राजीव गांधी उद्यान, उल्हासनगर कॅम्प २ या ठिकाणी रॅली काढण्यात आली. सर्व प्रथम राजीव गांधी उद्यानातील समाज हॉल येथे स्वर्गीय राजीव गांधी यांना देण्यात आली. त्यानंतर ऑपरेशन सिंदूर दरम्यान शाहिद झालेल्या जवानांना श्रद्धांजली त्याचप्रमाणे पहलगाम येथील अतिरेक्यांच्या हल्ल्यात मृत्यूमुखी पडलेल्या नागरिकांना देखील श्रद्धांजली वाहण्यात आली. काँग्रेस शहराध्यक्ष रोहित साळवे यांच्या नेतृत्वाखाली आयोजित या कार्यक्रमात काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी भारत माता की जय घोषणा देत रॅली काढली तसेच भारतीय सैन्यदलाच्या शौर्या करिता जयघोष केला. यावेळी काँग्रेस कमिटी अंतर्गत ब्लॉक अध्यक्ष किशोर धडके, माजी नगरसेविका अंजली साळवे, महिला अध्यक्ष मनीषा महाकाळे, प्रवक्ता अशेराम टाक, प्रो गेमनानी, श्याम मढवी, डॉ. हितेश साचवणी, कुलदीप ऐलसिंहांनी, फमीदा सय्यवद, पुष्पलता सिंग, उषा गिरी, सिंधुताई रामटेके, वामदेव भोयर आदींसह पदाधिकारी आणि कार्यकर्ता मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# टिटवाळ्यात अंमली पदार्थांचा साठा जप्त

## १ किलोहून अधिक गांजासह युवक अटकेत

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : टिटवाळा परिसरातील अंमली पदार्थ विक्रीच्या वाढत्या घटनांवर लगाम घालण्यासाठी कल्याण तालुका पोलिसांनी मोठी कारवाई करत गांजाच्या साठ्याचा पर्दाफाश केला आहे.

दिनांक २३ मे २०२५ रोजी सायंकाळी मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे, कल्याण तालुका पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सुरेश कदम यांच्या मार्गदर्शनाखाली एक पथक आंबेडकर नगर, मांडा, टिटवाळा (प.) येथे रवाना करण्यात आले. सदर ठिकाणी धाड टाकून दिशान दोस्तमोहम्मद खलिफा (वय २८ वर्ष) या इसमास ताब्यात घेण्यात आले. त्याची कसून झडती घेतली असता त्याच्याकडून १ किलो १३१ ग्रॅम इतक्या प्रमाणात गांजा हा अंमली पदार्थ सापडला.

पोलिसांनी सदर गांजा कायदेशीर प्रक्रियेने जप्त केला असून, आरोपीविरोधात एन.डी.पी.एस. (NDPS) कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कारवाईनंतर आरोपीला अटक करून न्यायालयात हजर करण्यात आले असता, न्यायालयाने त्यास २६ मे २०२५ पर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले आहेत.

या प्रकरणी पोलिसांकडून अधिक तपास सुरू असून, आरोपीच्या संपर्कातील इतर व्यक्तींचा शोध घेण्यात येत आहे. गांजाचा इतक्या मोठ्या प्रमाणात साठा सापडल्याने, या प्रकरणाचा संबंध अधिक मोठ्या रॅकेटशी असल्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे तपास अधिक सखोल केला जात आहे.

टिटवाळा परिसरात गेल्या काही काळात अंमली पदार्थांची चोरटी विक्री सुरू असल्याच्या तक्रारी नागरिकांकडून वारंवार येत होत्या. यानंतर पोलिसांनी गोपनीय माहिती संकलन सुरू करून ही कारवाई उभी केली.

# सावित्रीबाई फुले नाट्यगृह दुरुस्तीसाठी बंद

## रंगकर्मींनी आणि नाट्य रसिकांनी सहकार्य करावे महापालिकेचे आवाहन





दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : दिनांक 23 मे रोजी रात्री, कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या डोंबिवलीस्थित सावित्रीबाई फुले कलामंदिर, या नाट्यगृहातील फॉल सीलिंग चा तुकडा अचानक तुटून खाली पडल्यामुळे महापालिकेच्या शहर अभियंता अनिता परदेशी, प्रकल्प विभागाच्या कार्यकारी अभियंता रोहिणी लोकरे, कार्यकारी अभियंता मनोज सांगळे यांनी समक्ष जाऊन नाट्यगृहाची पाहणी केली आणि स्ट्रक्चरल इंजिनियरला अहवाल देणेबाबत निर्देश दिले.


सावित्रीबाई फुले कलामंदिर हे नाट्यगृह सुरू होऊन अठरा वर्षापेक्षा जास्त कालावधी झाला आहे .स्ट्रक्चरल इंजिनियर च्या मतानुसार फॉल्स सिलिंगचे फ्रेमिंग गंजलेले आणि कमकुवत झाल्यामुळे नव्याने करणे आवश्यक आहे , त्यामुळे आगामी पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर सावित्रीबाई फुले कला मंदिराची दुरुस्ती तातडीने करणे कामी सद्यस्थितीत सदर नाट्यगृह काही काळ बंद ठेवण्यासाठी महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांनी मंजुरी दिली असून होणाऱ्या गैरसोयीबाबत रंगकर्मी आणि नाट्य रसिकांनी सहकार्य करावे असे आवाहन महापालिकेमार्फत करण्यात येत आहे.

# पाकिस्तानचे बाराशे अकाऊंट ब्लॉक

## भारता विरोधी अफवा पसरविण्याचा प्रयत्न फेटाळला

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : प्रत्येकाच्या हातातील मोबाईल क्षणात जगभरातील घडामोडी वापरकर्त्यापर्यंत पोचवतो. याचाच फायदा घेत पहलगाम हल्ल्यानंतर पाकिस्तानी सोशल मिडीयाच्या माध्यमातून भारता विरोधी अफवा पसरविण्याचा जोरदार प्रयत्न सुरु होता. संपूर्ण भारतीय बनावटीच्या असलेल्या i – ai या ॲपवरून या अफवा पसरवल्यास त्याच्यावर अधिक विश्वास ठेवला जाईल या हेतूने पाकिस्तानातून ॲपवर दिवसभरात १२०० हून अधिक रिक्वेस्ट धाडण्यात आल्या. मात्र नेहमीपेक्षा येणाऱ्या रिक्वेस्ट वाढल्याचे आणि त्यातही याद्वारे भारता विरोधी मेसेज पाठवले जात असल्याचे लक्षात येताच ॲपचे निर्मात्या डोंबिवलीकर तरुणांनी पाकिस्तानच्या सर्व रिक्वेस्ट फेटाळून हि अकाऊट ब्लॉक करत व्यवसायापेक्षा देशप्रेमाला महत्व



दिले आहे.

डोंबिवलीतील कपिल अगरवाल या तरुणाने ओंकार मयेकर आणि ए आय तज्ञ यश कदम यांच्यासह देशभरातील तज्ञ इंजिनिअर्सना एकत्र आणून i-ai हे नवे कोरे ॲप बाजारात आणले असून सोशल मिडीयावरील अनेक प्रचलित ॲपना हे ॲप टक्कर देत आहे. चार महिन्याच्या कालावधीत या ॲपचे 10 लाखापेक्षा अधिक सबस्क्राईबर झाले असून इतर ॲपच्या तोडीस तोड माहिती पुरविणारे ॲप लोकांच्या पसंतीस उतरत आहे.

२२ एप्रिल रोजी पहलगाम दहशतवादी हल्ला झाल्यानंतर पुढील काळात निर्माण झालेल्या युद्धजन्य परिस्थितीच्या काळात सोशल मिडीयाच्या माध्यमातून पाकिस्तानी हॅकरनी सर्वच सोशल मिडिया प्लटफॉर्म वर बनावट अकाऊट तयार करून त्याद्वारे भारताविरोधी वातावरण तयार करण्याचा प्रयत्न चालवला होता. मात्र याची कुणकुण लागताच अग्रवाल आणि त्यांच्या टीमने त्यांचा हा प्रयत्न हाणून पाडताना आपल्या वापरकर्त्या पर्यंत चुकीची माहिती पोचू नये यासाठी दोन दिवसात १२०० पाकिस्तानी रिक्वेस्ट रिजेक्ट केल्या. देशप्रेमापुढे व्यवसाय कधीही मोठा नाही देशाबद्दल योग्य अशीच माहिती जगभरात पोचावी चुकीचे समज गैरसमज आपल्या माध्यमातून पसरले जाऊ नयेत याची काळजी घेऊनच आपण या रिक्वेस्ट फेटाळल्याचे अगरवाल यांनी सांगितले.






## खोदलेले रस्ते दुरुस्तीची मनसेची मागणी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

उल्हासनगरः सध्या अवकाळी पाऊस सुरू आहे. येत्या काही दिवसांनंतर नियमित पावसाळा सुरू होईल, मात्र गेल्या महिन्यांपासून भुयारी गटारींची कामे शहरभरात सुरू आहेत. त्यासाठी शहरातील अनेक मुख्य रस्ते, जोड रस्ते खोदून ठेवलेले आहेत. त्यामुळे मोठ्या प्रमाणात अपघात होण्याची शक्यता असल्याची तक्रार मनसेने केली आहे. मनपाने तातडीने खोदकाम थांबवून खड्डे बुजवावेत, अशी मागणी देखील पक्षातर्फे करण्यात आली आहे. ईगल कंपनीकडून जे रस्ते खोदण्याच काम सुरू आहे. ते तात्काळ बंद करून अगोदर खोदलेल्या सर्व रस्त्यांची दुरुस्ती तातडीने करण्यात यावी. जेणे करून पावसाळ्यात होणारे छोटे मोठे अपघात टाळता येतील. यापुढे पावसाळा संपेपर्यंत कोणतेही रस्ते खोदू नये असे सक्त आदेश ठेकेदाराला देण्यात यावेत. अशी मागणी मनसे जिल्हा अध्यक्ष बंडू देशमुख आणि शहर अध्यक्ष संजय घुगे यांनी महापालिका



आयुक्त मनीषा आव्हाळे यांच्यकडे केली आहे. या संदर्भात आयुक्त मनीषा आव्हाळे यांनी बैठक घेऊन ठेकेदाराला तशा तात्काळ सूचना देण्यात येतील, असे आश्वासन मनसे शिष्टमंडळाला दिले.

## प्रा. अशोक ढोले
### आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरी बद्दल महाराष्ट्र राज्य हिंदी अध्यापक संघातर्फे दिला जाणारा पुणे जिल्हा हिंदी आदर्श शिक्षक पुरस्कार आमदार सत्यजित तांबे (पदवीधर मतदार संघ, नाशिक) यांच्या हस्ते अशोक ढोले यांना प्रदान करण्यात आला. या प्रसंगी साहेबरावजी घाडगे पाटील, (मा. उपायुक्त मनपा मुंबई, संस्थापक अध्यक्ष त्रिमूर्ती पावन प्रतिष्ठान) मिलिंदजी कांबळे (अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य हिंदी अध्यापक संघ) रेवणनाथ कर्डिले ( सचिव, महाराष्ट्र राज्य हिंदी अध्यापक संघ ) डॉ. नेहा बोरसे (अध्यक्ष,पुणे विभाग) आदि मान्यवर उपस्थित होते. अहिल्यानगर जिल्ह्यातील नेवासा येथील त्रिमूर्ती पावन प्रतिष्ठान येथे महाराष्ट्र राज्य हिंदी अध्यापक संघाची द्विदिवसीय कार्यशाळा 21 ते 22 मे दरम्यान संपन्न होत आहे. या प्रसंगी हा पुरस्कार देण्यात आला आहे.

प्रा. अशोक ढोले हे पुण्यातील सिंबायोसिस या नामांकित महाविद्यालयामध्ये गेल्या 20 वर्षापासून अध्यापनाचे पवित्र कार्य करत आहेत. त्यांनी मागील वर्षी भारत सरकार , सांस्कृतिक मंत्रालयातर्फे हैदराबाद येथे 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020' यावर 21 दिवसांचे प्रशिक्षण पूर्ण केले आहे. यासाठी महाराष्ट्र राज्यातून निवडण्यात येणाऱ्या 10 शिक्षकांमध्ये त्यांची निवड झाली होती. तसेच त्यांनी शालेय शिक्षण व क्रीडा विभाग व जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था पुणे आयोजित ' शिक्षक क्षमता वृद्धी प्रशिक्षण २.०' या प्रशिक्षण कार्यामध्ये तज्ञ मार्गदर्शक म्हणून कार्य केले आहे. त्यांच्या या आणि अशा अनेक कार्याची दखल घेऊन महाराष्ट्र राज्य हिंदी अध्यापक संघाकडून त्यांना हा आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. याबद्दल त्यांचे, सिंबायोसिस कॉलेजच्या प्राचार्या श्रीमती टेसी थडतील उपप्राचार्य ऋचा फोंडगे कॉलेजचे सहकारी, मित्र परिवार यांचेकडून अभिनंदन करण्यात आले आहे.

## जिझिया कर रद्द करावा अन्यथा आंदोलन करू
### शिवसेना ठाकरे गटाचा इशारा

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

डोंबिवली : कल्याण डोंबिवली महापालिकेचा कोणतीही करवाढ नसलेला अर्थसंकल्प सादर झाला आहे. असे असताना अचानक कचरा संकलनाच्या करामध्ये ३०० रुपयांची वाढ कशी काय केली, असा प्रश्न विचारत नागरिकांवर लादलेला हा जिझिया कर रद्द करावा अन्यथा शिवसेना ठाकरे गटाच्या वतीने आम्ही रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन करू. नागरिक हा वाढीव कर भरणार नाहीत, याबाबत लवकरच आयुक्तांची भेट घेणार आहोत, अशी माहिती शिवसेना ठाकरे गटाचे कल्याण जिल्हाप्रमुख दीपेश म्हात्रे यांनी दिली. शिवसेना ठाकरे गटाचे पक्षाचे जिल्हाप्रमुख दीपेश म्हात्रे यांच्या वतीने शुक्रवारी (ता. २३) पत्रकार परिषद घेत अतिरिक्त करवाढ, कचरा संकलन, ड्रेनेज सफाई, रस्त्यांवरील खड्डे इत्यादी नागरी समस्यांवरून केडीएमसी प्रशासनाला धारेवर धरून प्रशासन आणि सत्ताधारी पक्षाचा भांडाफोड केला. या वेळी अनेक मान्यवर उपस्थित होते. कचरा संकलनासाठी केडीएमसी प्रशासनाकडून नवीन कर पद्धतीनुसार सर्वसामान्य नागरिकांवर ५०



टक्क्यांपर्यंत करवाढ लादली आहे. ६०० रुपयांचा वार्षिक कर आता ९०० रुपयांचा करण्यात आला आहे. घराचे क्षेत्रफळ लहान असो वा मोठे, सर्वांना हा समान कर लावण्यात आला आहे. ही सरळ सरळ जनतेची लूट आहे, असा आरोप म्हात्रे यांनी केला. कचरा संकलन आणि वाहतूक या नव्या योजनेअंतर्गत कचऱ्याचे केवळ संकलन केले जाणार आहे. त्यावर कोणतीही प्रक्रिया केली जाणार नाही. सध्या कल्याण-डोंबिवलीत दररोज सुमारे ८५० टन कचरा तयार होतो; मात्र उंबर्डे, बारावे आणि डोंबिवलीतील लवकरच सुरू होणाऱ्या प्लांटची एकत्रित प्रक्रिया क्षमता जवळपास ६५० टन एवढीच आहे. मागील अनेक वर्षांपासून पडलेला कचरा दुर्गाडी किल्ल्यासमोरील डोंगरावर आहे. मागील अनेक वर्षांपासून तिथे १० हजार मेट्रिक टन कचरा साचलेला असून, कोणतीही प्रक्रिया केलेली नसल्याचेही म्हात्रे यांनी या वेळी सांगितले.

#### काँक्रीटीकरणाची कामे रखडली

महापालिकेतील ठेकेदार बदलले जातात पण काम करणारी माणसे तीच राहतात. पण कामाच्या दर्जात कोणताही फरक पडलेला नाही. सत्ताधारी पक्ष लपवाछपवी करून जनतेवर आर्थिक बोजा टाकत असल्याचा आरोपही दीपेश म्हात्रे यांनी केला. शहरातील ड्रेनेज आणि रस्त्यांची अवस्था दयनीय आहे. काँक्रीट रस्त्यांची कामे रखडली आहेत. अशा परिस्थितीत एकही नवीन ठेकेदार नेमलेला नाही. येणाऱ्या पावसाळ्यात शहरात गंभीर समस्या निर्माण होण्याची शक्यता आहे; मात्र प्रशासन याबाबत गंभीर नसल्याचे म्हात्रे यांनी सांगितले.

प.पु.स.रमणनाथजी महाराज संजीवन समाधी ट्रस्ट

भोगावती नगर ( तानसा), ता. शहापूर, जि.ठाणे



प.पु.स.अलोकनाथजी महाराज

ऐश्वर्यातून निघून भिक्षेकऱ्यांचे गुरु आज्ञेने जीवन जगणे हे तप होय. सधन असून भिक्षा मागणे ही साधना होय ती म्हणजे अहंकाराला मारण्याची. समर्पणचा अर्थ होतो आपली स्वतःची आता कंडीशनींग नाही, आपल्या अनुकुलतेची मागणी नाही. मी म्हणणारा माझा अहंकार नाही. जी गुरुची आज्ञा असेल तसे वागु, तशी भक्ती करु. तशी साधना करु. जी गुरुची मर्जी असेल ते स्वीकारु. खरा शिष्य गुरु जवळ काही मागायला नाही जात. खरा शिष्य तो आहे जो गुरु समर्पणात स्वतःला पूर्णतः समर्पित करायला तयार आहे. जशी नदी समर्पित होते सागरात. सागररूपच होते. गंगा सागर होते. गंगा मिळाली सागराला. अशीच शिष्याची अहंकाराची नदी सदगुरुचे परब्रह्मस्वरुप सागरात विलीन होते. गुरुचरणी समाप्त करतो आपल्या अहंमतेच्या अस्तित्वाला.

## औद्योगिक प्रशिक्षण संस्थामधील (आयटीआय ) शिक्षण ठरतेय रोजगार व स्वयंरोजगारांसाठी वरदान

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : शालांत परीक्षा उत्तीर्ण (१०वी ) होऊन भविष्याची स्वप्न पाहणाऱ्या पिढीने भविष्यातील स्वप्न साकार करण्यासाठी भविष्यकाळात रोजगार उपयोगी ठरणारे प्रशिक्षिण औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये दिल्यानंतर औद्योगिक आस्थापनेत वापरण्यात येणारी यंत्रसमग्री व तंत्र यांचे ज्ञान व कौशल्य प्राप्त करून सर्वदृष्टीने पूर्ण कुशल बनावा यासाठी शिकाऊ उमेदवारी योजना आस्तित्वात आली. शिकाऊ उमेद्वाराना केंद्र शासनाने मंजूर केलेल्या दरानुसार प्रशिक्षण कालावधीमध्ये विद्यावेतन मिळते. औद्योगिक प्रशिक्षण संस्था मधील प्रशिक्षण पूर्ण केल्यावर उच्च शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांना पदविका अभ्यासक्रमाच्या दुसऱ्या





वर्गात भेट प्रवेश दिला जातो. अशा प्रकारे औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना रोजगार, स्वयंरोजगार, शिकाऊ उमेदवीरी योजनेअंतर्गत संधी व उच्च शिक्षणाची संधी उपलब्ध आहे.

ठाणे शहरांमध्ये दोन शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था कार्यरत आहेत. त्यामध्ये धर्मवीर आनंद दिघे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था रामनगर, वागळे इस्टेट ठाणे, येथे निसर्गाचे सानिध्यात अस्तित्वात आहे. या संस्थेमध्ये बिगर अभियांत्रिक व्यवसाय, अभियांत्रिकी व्यवसाय गटामध्ये 13 अभ्यासक्रमासाठी प्रवेश दिला जातो. यावर्षी या संस्थेमध्ये 596 प्रवेश क्षमता असून यासाठी 48 युनिट आहेत. त्यामध्ये एकूण प्रवेश 1040 विद्यार्थी प्रशिक्षण घेणार आहेत. या औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये विद्यार्थ्यांना वस्तीगृहाची व्यवस्था असून सदर वस्तीगृहामध्ये 100 विद्यार्थ्यांची क्षमता आहे.

या संस्थेमधे कॉम्प्युटर हार्डवेअर अँड नेटवर्क मेंटेनेस, स्टेनोग्राफर सेक्रेटरीयल असिस्टंट ( इंग्रजी ), संधाता, विजतंत्री, इलेक्ट्रॉनिक्स मेकॅनिक, जोडारी, यंत्र कारागीर, मेकॅनिक मशीन टूल मेंटेनन्स, यांत्रिक मोटारगाडी, यांत्रिक प्रशिक्षण व वातानुकूलिकरण, कातारी, इन्फॉर्मेशन अँड कम्युनिकेशन टेक्नॉलॉजी सिस्टम व आरेखन यांत्रिक या अभ्यासक्रमासाठी प्रवेश दिला जातो. तसेच मुलींसाठी राजमाता जिजाऊ शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था कोपरी, ठाणे येथे कार्यरत आहे. या ठिकाणी 09 कोर्सेससाठी 390 मुलींना प्रवेश दिला जातो. या संस्थेमध्ये आदिवासी विद्यार्थिनींसाठी वस्तीगृहाची व्यवस्था असून त्यामध्ये 50 विद्यार्थीनींची क्षमता आहे.

सदर कोर्स करणारे विद्यार्थ्यांना अत्यंत माफक फी आकारली जाते तसेच विद्यावेतन सुद्धा दिले जाते. पंतप्रधानांच्या मेक इन इंडिया या संकल्पनेस अनुसरून स्कील इंडिया या नावाने कौशल्य विकास या कार्यक्रमास केंद्र शासनाने सर्वोच्च प्राधान्य दिले आहे. तसेच डिजीटल इंडिया, स्वच्छ भारत, स्मार्ट शहरे, सांसद, आदर्श ग्राम योजना, प्रधानमंत्री जनधन योजना इत्यादी उपक्रमांना राष्ट्रीय प्राधान्य देण्यात आल्याने देखील विविध क्षेत्रातील रोजगाराच्या संधी मोठ्या प्रमाणात निर्माण होत आहेत.

**औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमधील कोर्सेससाठी इतर शिक्षणाचे मानाने कमी फी आकारली जाते. गरीब घरातील विद्यार्थी लवकरात लवकर रोजगार व कमी वेळात अर्थार्जनाची संधी मिळावी म्हणून प्रवेश घेतात. यामध्ये विद्यार्थी सक्षम बनून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधला जातो. तसेच शिकाऊ उमेदवारांना प्रशिक्षण कालावधीमध्ये विद्यावेतन मिळते. संस्थेच्या वतीने उद्योगधंद्यातील तज्ञांची व्याख्याने, कॅम्पस इंटरव्ह्यू, प्रशिक्षण समताच शिकाऊ उमेदवारांना नोकरी मिळून देण्यासाठी मदत केली जाते. सदरचे प्रवेश हे ऑनलाइन प्रणालीद्वारे दिले जात आहेत. तरी विद्यार्थ्यांनी या क्षेत्रात आपला प्रवेश आजच निश्चित करावा.**

**- एस. एस. माने,प्राचार्या,धर्मवीर आनंद दिघे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, ठाणे**

## सर्पमित्रांकडुन विषारी नागाला जिवदान



पडघा : भिवंडी तालुक्यातील गोदाम पट्टा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या वडपे येथील एका गोट फार्ममध्ये शिरलेल्या विषारी नागाला सर्पमित्रांकडुन जिवदान देण्यात आले.

मुंबई नाशिक महामार्गालगत असलेल्या शामियाना ढाब्यासमोर असलेल्या दर्याबादी गोट फार्ममध्ये भक्ष्याच्या शोधात असलेला अतिशय विषारी दुर्मिळ जातीचा नाग शिरला असल्याचे तेथील गोट फार्ममालकाच्या लक्षात येताच त्यांनी सर्पमित्र मयुर शांताराम बजागे( वांद्रे ) व रवि नाना दांडगे (पडघा) यांना पाचारण केले होते. फणा काढून कमरेएवढा उभा राहणाऱ्या नागाला सर्पमित्रांनी मोठ्या शिताफीने पकडून जिवदान दिले. त्यानंतर त्याला सुरक्षीत ठिकाणी सोडून देण्यात आले. साप हा हजारो टन धान्य फस्त करणारे व विविध स्तरावर नुकसान करणारे उंदीर, घुशी यांना खातो त्यामुळे सापाला शेतकऱ्यांचा मित्र संबोधले जाते मात्र अज्ञानामुळे व घाबरून नागरीक सापाची नाहक हत्या करतात तसे न करता साप दीसताच सर्पमित्रांना पाचारण करा. तसेच गर्मी व अवकाळी पावसांमुळे साप भक्ष्याच्या शोधात नागरी वस्तीत येत असल्याने नागरीकांनी रात्रीच्या वेळी काळजी घेण्याचे आवाहन सर्पमित्रांनी केले आहे.

## सुधारणा मोहिमेत 'ठाणे प्रादेशिक' प्रथम

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : राज्य सरकारने राबविलेल्या १०० दिवसांच्या कार्यालयीन सुधारणा विशेष मोहिमेत ठाणे प्रादेशिक परिवहन कार्यालय राज्यात अव्वल ठरले आहे. प्रशासकीय कामकाजात आवश्यक सुधारणा आणि आधुनिकता आणून या कार्यालयाने पाहिला क्रमांक मिळवला आहे. २३ मे रोजी हा निकाल जाहीर झाला. ठाणे कार्यालयाच्या प्रादेशिक परिवहन अधिकारी हेमांगिनी पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यालयीन कामात अनेक सकारात्मक बदल घडवण्यात आले. येथे येणाऱ्या लोकांची कामे अधिक गतीने आणि विना रांग व्हावेत यासाठी आधुनिकता आणली आहे. परिसरात स्वच्छता आणि टापटीपपणा आणला आहे. प्रत्येक खिडकीवर संबंधित ऑनलाइन व फेसलेस कामासाठी क्यूआर कोड लावण्यात आले आहेत.



## उल्हासनगरात गोडाऊनला आग

**रिजेन्सी अँटेलिया उल्हासनगर १ येथे रॉ मटेरियल फायबर सीट च्या गोडाऊनला आग लागली होती. उल्हासनगर अग्निशमन दलाच्या ४ फायरव्हॅन व कल्याण अग्नीशमन दलाची १ तसेच सेंच्युरी कंपनी यांची १ फायरव्हॅन च्या सहाय्याने चारी बाजूने आगीवरती पाणी मारून आग कंट्रोल करण्यात आली.**

## साहित्य भारतीच्या राज्य अध्यक्षपदी प्राचार्य डॉ. बळीराम गायकवाड

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : अखिल भारतीय साहित्य परिषद पुरस्कृत साहित्य भारती महाराष्ट्र प्रदेश कार्यकारिणीच्या अध्यक्षपदी प्राचार्य डॉ. बळीराम गायकवाड यांची नुकतीच निवड करण्यात आली आहे. अखिल भारतीय साहित्य परिषद - पुरस्कृत साहित्य भारतीच्या कार्यकारिणीत उपाध्यक्षपदी नांदेडचे डॉ.रवींद्र बेंबरे आणि जळगावचे डॉ.सुभाष महाले यांची तर कार्याध्यक्षपदी शशिकांत घासकडबी, प्रदेश मंत्रिपदी डॉ. पृथ्वीराज तौर, सहमंत्रिपदी प्रा.अरुण ठोके, प्रदेश संघटन मंत्रीपदी नीतीन केळकर, ठाणे यांची तसेच प्रचार/समाज माध्यम प्रमुख म्हणून निकीता भागवत, ठाणे यांची निवड करण्यात आली आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे क्षेत्रीय प्रचार विभागप्रमुख प्रमोद बापट यांनी ही कार्यकारिणी जाहीर केली.

प्राचार्य डॉ. बळीराम नामदेवराव गायकवाड हे सध्या मुंबई विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन आणि विस्तार विभागाचे संचालक म्हणून कार्यरत आहेत. इंग्रजी विषयातील एम. ए. एम. फिल. नेट व पीएचडी या उच्च शिक्षणा बरोबरच फुलब्राईट पोस्ट डॉक्टरेट या आंतरराष्ट्रीय क्षेत्रातील अमेरिकेतून दिल्या जाणाऱ्या नामांकित फेलोशिपचेही ते मानकरी आहेत. मुंबई विद्यापीठाचे माजी कुलसचिव आणि सध्याचे मुंबई विद्यापीठ सिनेट (अधी सभा ) सदस्य असणारे डॉ. बळीराम गायकवाड यांनी दलीत साहित्य, आफ्रिकन अमेरिकन साहित्य, वंश, जात, तौलणिक साहित्य, भारतीय इंग्रजी साहित्यावर २३ राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय पातळीवरील शोध निबंधाचे सादरीकरण केले आहे. अमेरिकन दूतावास न्यूयॉर्क, कोलंबिया विद्यापीठ अमेरिका, फ्लोरिडा विद्यापीठ अमेरिका, सेंट. बोनावेंचर विद्यापीठ अमेरिका, आदी विद्यापीठांमध्ये व्याख्याने दिली आहेत. मुंबईतील रशियन दूतावास आणि अमेरिकन दूतावास येथेही व्याख्याते म्हणून ते निमंत्रित होते. प्रा. गायकवाड यांनी इंग्रजी साहित्याधारीत ५ पुस्तकांबरोबरच साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे यांच्या जगप्रसिद्ध "फकिरा" या कादंबरीचा इंग्रजी अनुवाद व पेंग्विन पब्लिशिंग हाऊस दिल्ली यांच्याकडून २०२१ मध्ये प्रकाशन केलं आहे. प्रा. डॉ



बळीराम गायकवाड यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या 'माझी आत्मकथा-डॉ. बाबासाहेब आंबेडकर' या पुस्तकाचा इंग्रजी अनुवाद केला आहे. मुंबई विद्यापीठाच्या 'साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे अध्यासन केंद्राचे प्रभारी संचालक " व महाराष्ट्र शासनाच्या साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे चरित्र साधने प्रकाशन समितीचे सदस्य म्हणूनही ते जबाबदारी सांभाळत आहेत. सार्क देशांचा संयुक्त उपक्रम असलेल्या "साउथ एशियन युनिव्हर्सिटी दिल्ली" येथे आयोजित आंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये प्रमुख व्याख्याते म्हणून ते निमंत्रीत होते. भारत सरकारच्या सीसीआरटी 'सेंटर फॉर कल्चर अँड रिसर्च ट्रेनिंग' दिल्ली या केंद्रीय संस्थेच्या अभ्यास मंडळावर ही सदस्य म्हणून त्यांची नियुक्ती झाली आहे. २०२३ सालच्या ९६ व्या अखिल भारतीय साहित्य संमेलनात व साहित्य अकादमी दिल्ली द्वारा आयोजित 'साहित्योत्सव २०२५' मध्येही प्रा. गायकवाड यांनी व्याख्याने दिली आहेत.

साहित्य भारतीच्या महाराष्ट्र प्रदेश कार्यकारिणीच्या अध्यक्षपदी डॉ. बळीराम गायकवाड यांची निवड होणे ही केवळ ठाणे जिल्ह्यासाठी नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्र राज्यासाठी अभिमानाची आणि कौतुकाची गोष्ट आहे. सदर निवड झाल्याबद्दल महाराष्ट्र राज्याच्या विविध भागातील साहित्यिक, सामाजिक कार्यकर्ते, विविध सेवाभावी संस्था यांच्याकडून प्रा. डॉ. बळीराम गायकवाड यांच्यावर शुभेच्छा व अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. अखिल भारतीय साहित्य परिषद पुरस्कृत साहित्य भारतीचे माजी कार्याध्यक्ष डॉ. नरेंद पाठक, माजी उपाध्यक्ष विसूभाऊ बापट, कोंकण प्रांत कार्याध्यक्ष तथा थोर विचारवंत व साहित्यिक प्रवीण देशमुख व सर्व पदाधिकारी व सदस्यांकडून डॉ.बळीराम गायकवाड यांचे अभिनंदन करण्यात येत आहे. अखिल भारतीय साहित्य परिषद पुरस्कृत साहित्य भारती कोंकण प्रांतचे कोषाध्यक्ष तथा राष्ट्रीय पातळीवर उल्लेखनीय कार्य करणाऱ्या स्वामी विवेकानंद संस्था पाली, शहापूर या संस्थेतर्फे संस्थेचे संस्थापक अध्यक्ष सुनील म्हसकर यांनीही डॉ. बळीराम गायकवाड यांचे अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या आहेत.

जीवनदीप शैक्षणिक संस्था पोई, संचलित

सौ.कमलताई किसन कथोरे कॉलेज, म्हसा मुंबई विद्यापीठाशी संलग्न

ADMISSION OPEN 2025-26

११ वी व १२ वी ARTS, COMMERCE, SCIENCE

UNDER GRADUATE: B.A. / B.Com. / B.Sc. CHEMISTRY / B.Sc. MATHS / BAF / BMS

POST GRADUATE: M.Sc. CHEMISTRY / M.Com. ADVANCED ACCOUNTANCY / M.A. MARATHI / M.A. ECONOMICS / M.A. SOCIOLOGY / M.A. HISTORY



Look forward to a BRIGHTER FUTURE

7038658191
9130580111

जीवनदीप शैक्षणिक संस्था,पोई संचलित

जीवनदीप कौशल्य विकास केंद्र गोवेली

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग संचलित

प्रवेश सुरु! प्रवेश सुरु! प्रवेश सुरु!

| | | |
|---|---|---|
| १ | बांधकाम पर्यवेक्षक (कोड नं.३०४२०२) | कालावधी १ वर्ष |
| २ | पॅथोलॉजी टेक्नीशियन (कोड नं.२०१२३०) | कालावधी १ वर्ष |
| ३ | जनरल नर्सिंग आणि मिडवाइफरी असिस्टंट (GNMA) (कोड नं.२०१२३७) | कालावधी १ वर्ष |
| ४ | डिप्लोमा कोर्स इन मेडिकल लॅब टेक्निशियन (DMLT) (कोड नं.२०१४०४) | कालावधी २ वर्ष |
| ५ | सिक्युरिटी अ‍ॅण्ड फायर प्रिव्हिजन प्रशिक्षण (कोड नं.४१११२४) | कालावधी ६ महिने |

पात्रता : १० वी / १२ वी / पदवी

संपर्क : जीवनदीप कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय गोवेली, पो.रायते, ता.कल्याण, जि.ठाणे

Call : 8108559566 / 9158518832 / 9619188558

'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री.रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले.
(या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही) (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - अ‍ॅड. जयकुमार ए. रिजवानी)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८, ९०८२६६४७८१ E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 Postal Registration No. THC/256/2022-2024